Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

पोलिसी कर्तव्यापासून समाजसेवेपर्यंत... प्रवीण पप्पूदादा पाटील यांचा प्रेरणादायी प्रवास! (पान २ वर)



। सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १९५ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

» Selected

केवळ गोळीबार की मोठे नेटवर्क?

मुंबई। बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणाच्या तपासात आता एक अत्यंत धक्कादायक आणि मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणाच्या तपासाला थेट 'प्रेमप्रकरणाचा अँगल' मिळाला असून पोलिसांच्या हाती महत्त्वाची माहिती लागली आहे. गोळीबारासाठी वापरलेली पिस्तूल ही मुख्य आरोपीच्या प्रेयसीनेच दिल्लीहून मुंबईत आणल्याचे उघडकीस आल्याने या हायप्रोफाईल केसमध्ये मोठा सस्पेन्स निर्माण झाला आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य आरोपी कुणाल याने आपल्या प्रेयसीला दिल्लीहून पिस्तूल आणण्यास सांगितले होते. केवळ पिस्तूल आणायला सांगून तो थांबला नाही, तर प्रेयसी सुरक्षितपणे मुंबईत पोहोचावी म्हणून त्याने तिच्यासोबत अजून एका तरुणीलाही पाठवले होते. या दोन्ही तरुणी मुंबईत आल्यानंतर त्यांची एका रात्री राहण्याची संपूर्ण व्यवस्था आरोपी कुणालनेच केली होती, अशी खळबळजनक माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या सहमतीचा पक्षाचा दावा!, सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील नेत्यांची 'वर्षा'वर फडणवीसांशी चर्चा

हिवाळी अधिवेशनापूर्वी अर्थ खाते 'राष्ट्रवादी'कडे?

छगन भुजबळ म्हणाले, "अर्थ खाते देण्याबाबत मुख्यमंत्री सकारात्मक"

जन सम्राट टाईम्स

मुंबई | राज्याच्या राजकारणात अर्थ खात्यावरून महायुतीतील हालचालींना वेग आला आहे. हिवाळी अधिवेशनापूर्वी अर्थ खाते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे सोपविण्याची मागणी पक्षाने लावून धरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी केला आहे. त्यामुळे आगामी हिवाळी अधिवेशनापूर्वी खातेवाटपात बदल होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या हालचालींना वेग आल्याचे रविवारी दिसून आले. पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्यासह पक्षातील प्रमुख नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत अर्थ खाते पुन्हा पक्षाला देण्याची मागणी करण्यात आली. मागील आठवड्यात दिल्ली दौऱ्यादरम्यान सुनेत्रा पवार आणि राज्यसभा खासदार पार्थ पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याची माहिती आहे. या भेटीत मुख्यमंत्र्यांकडे असलेले अर्थ खाते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसला देण्याची मागणी करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. तसेच पक्षाच्या मंत्रिपदांमध्ये फेरबदल करण्याबाबतही चर्चा झाल्याचे समजते. यानंतर रविवारी सकाळी सुनेत्रा पवार यांच्या 'देवगिरी' या शासकीय निवासस्थानी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक झाली. या बैठकीत अर्थ खाते अद्याप पक्षाकडे परत न आल्याबद्दल नाराजी व्यक्त



करण्यात आल्याची माहिती आहे. आगामी राजकीय घडामोडी आणि पक्षाच्या भूमिकेबाबतही या बैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात येते. कोअर कमिटीच्या बैठकीनंतर सुनेत्रा पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी 'वर्षा' निवासस्थानी पोहोचले. या वेळी जवळपास अर्धा तास चर्चा झाली. अर्थ खाते पुन्हा पक्षाला मिळावे, ही मागणी नेत्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. बैठकीनंतर पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी चर्चेची माहिती दिली. अर्थ खाते लवकरात लवकर राष्ट्रवादी काँग्रेसला द्यावे, या मागणीवर मुख्यमंत्री सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, निधीची जुळवाजुळव आणि आर्थिक बाबींचा विचार करून खाते देण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचा दावा भुजबळ यांनी केला. अर्थ खाते हे राज्याच्या आर्थिक धोरणांशी, निधीच्या नियोजनाशी आणि विविध विकासकामांच्या तरतुदींशी संबंधित महत्त्वाचे खाते मानले जाते. त्यामुळे या खात्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून सातत्याने केली जात असल्याने महायुतीतील खातेवाटपाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. दरम्यान, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी करून घेण्याबाबत सुरू असलेल्या चर्चेचाही कोअर कमिटीच्या बैठकीत उल्लेख झाल्याचे वृत्त आहे. मात्र, या संदर्भात कोणताही अंतिम निर्णय झाल्याची माहिती समोर आलेली नाही. हिवाळी अधिवेशनापूर्वी अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे सोपविले जाणार का, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर पक्षाने सकारात्मक संकेत मिळाल्याचा दावा केला असला, तरी अंतिम निर्णय आणि त्याची अधिकृत घोषणा याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या हालचालींना वेग आल्याचे रविवारी दिसून आले. पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्यासह पक्षातील प्रमुख नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत अर्थ खाते पुन्हा पक्षाला देण्याची मागणी करण्यात आली.

खातेवाटपाबाबत अंतिम निर्णयाकडे लक्ष

अर्थ खाते हे राज्याच्या आर्थिक धोरणांशी, निधीच्या नियोजनाशी आणि विविध विकासकामांच्या तरतुदींशी संबंधित महत्त्वाचे खाते मानले जाते. त्यामुळे या खात्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून सातत्याने केली जात असल्याने महायुतीतील खातेवाटपाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

'वर्षा'वर अर्धा तास चर्चा

मागील आठवड्यात दिल्ली दौऱ्यादरम्यान सुनेत्रा पवार आणि राज्यसभा खासदार पार्थ पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याची माहिती आहे. या भेटीत मुख्यमंत्र्यांकडे असलेले अर्थ खाते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसला देण्याची मागणी करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. तसेच पक्षाच्या मंत्रिपदांमध्ये फेरबदल करण्याबाबतही चर्चा झाल्याचे समजते. यानंतर रविवारी सकाळी सुनेत्रा पवार यांच्या 'देवगिरी' या शासकीय निवासस्थानी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक झाली. या बैठकीत अर्थ खाते अद्याप पक्षाकडे परत न आल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आल्याची माहिती आहे. आगामी राजकीय घडामोडी आणि पक्षाच्या भूमिकेबाबतही या बैठकीत चर्चा झाल्याचे सांगण्यात येते. कोअर कमिटीच्या बैठकीनंतर सुनेत्रा पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी 'वर्षा' निवासस्थानी पोहोचले. या वेळी जवळपास अर्धा तास चर्चा झाली. अर्थ खाते पुन्हा पक्षाला मिळावे, ही मागणी नेत्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. बैठकीनंतर पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी चर्चेची माहिती दिली. अर्थ खाते लवकरात लवकर राष्ट्रवादी काँग्रेसला द्यावे, या मागणीवर मुख्यमंत्री सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, निधीची जुळवाजुळव आणि आर्थिक बाबींचा विचार करून खाते देण्याबाबत निर्णय घेतला



पोलिसी कर्तव्यापासून समाजसेवेपर्यंत... प्रवीण पप्पूदादा पाटील यांचा प्रेरणादायी प्रवास!



२२ वर्षांची पोलीस सेवा, १५ वर्षे पालकमंत्र्यांचे अंगरक्षक म्हणून जबाबदारी; ३५ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा घेतला ध्यास, तर पत्नी सुरेखा पाटील यांच्या ग्रामविकासाच्या कार्याला खंबीर साथ

अमळनेर | वाढदिवस विशेष | दैनिक जनसम्राट टाईम्स

माणसाचे मोठेपण त्याच्या पदावरून नव्हे, तर त्याच्या कार्यातून, समाजाप्रती असलेल्या बांधिलकीतून आणि इतरांच्या आयुष्यात घडवून आणलेल्या सकारात्मक बदलांतून सिद्ध होत असते. वर्दीतील कर्तव्यनिष्ठा, मैत्रीतील दिलदारपणा, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दिलेला आधार आणि गावाच्या विकासासाठी असलेली तळमळ या गुणांचा संगम म्हणजे प्रवीण संभाजी पाटील उर्फ पप्पूदादा! जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील ढेकूसिम या गावाशी घट्ट नाळ जोडलेले प्रवीण पाटील यांनी पोलीस सेवेत राहून कर्तव्य बजावतानाच सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सेवाभावी वाटचालीचा आणि कुटुंबाच्या माध्यमातून सुरू असलेल्या ग्रामविकासाच्या कार्याचा घेतलेला हा विशेष आढावा.

दैनिक जनसम्राट टाईम्स परिवाराकडून प्रवीण संभाजी पाटील उर्फ पप्पूदादा यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

शेतकरी कुटुंबातून घडलेले व्यक्तिमत्त्व

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या प्रवीण पाटील यांच्या जडणघडणीत गावातील माणसे, त्यांचे प्रश्न आणि ग्रामीण जीवनातील संघर्ष यांचा मोठा वाटा आहे. ग्रामीण परिस्थितीची जाणीव असल्यामुळेच समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याची भावना त्यांनी जपली आहे. पोलीस दलातील जबाबदारी सांभाळताना आपल्या मातीशी असलेले नाते त्यांनी कायम टिकवून ठेवले.पोलीस सेवेत २२ वर्षांचा अनुभव गाठीशी असलेले प्रवीण पाटील हवालदार म्हणून कार्यरत आहेत. शिस्त, तत्परता, जबाबदारी आणि कर्तव्यनिष्ठा या पोलीस सेवेतील महत्त्वाच्या मूल्यांशी त्यांची कारकीर्द जोडलेली आहे. जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे मागील १५ वर्षांपासून अंगरक्षक म्हणून काम करण्याची जबाबदारीही ते सांभाळत आहेत. या भूमिकेत विश्वास, सावधगिरी आणि प्रसंगावधान यांना विशेष महत्त्व असते. दीर्घकाळ ही जबाबदारी पार पाडताना सेवाभाव आणि शिस्त जपणे ही त्यांच्या कार्यप्रवासातील महत्त्वाची बाब आहे. वर्दीतील कर्तव्य आणि समाजाप्रती बांधिलकी पोलीस कर्मचारी म्हटले की कायदा-सुव्यवस्था, बंदोबस्त, जनतेची सुरक्षा आणि कर्तव्याच्या वेळेची अनिश्चितता या गोष्टी समोर येतात. अशा व्यस्त सेवेत असतानाही आपल्या गावातील लोकांशी संपर्क कायम ठेवणे आणि त्यांच्या अडचणी समजून घेणे, यासाठी सामाजिक जाणीव असणे आवश्यक आहे. प्रवीण पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वातील हीच बाजू त्यांच्या परिचितांकडून विशेषत्वाने अधोरेखित केली जाते. मित्रपरिवारात दिलदार स्वभाव, मनमोकळेपणा आणि मदतीसाठी तत्पर असणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख असल्याचे सांगितले जाते. समाजातील विविध स्तरांतील लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणे आणि शक्य असेल तिथे मदत करणे, ही त्यांची कार्यशैली आहे. पदामुळे माणसांशी संबंध निर्माण होतात; मात्र माणुसकीमुळे ते संबंध टिकतात. प्रवीण पाटील यांच्या सामाजिक वाटचालीकडे पाहताना ही बाब महत्त्वाची ठरते.

३५ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी

प्रवीण पाटील यांच्या सामाजिक कार्यातील सर्वाधिक उल्लेखनीय बाब म्हणजे गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि जिद्द असते; मात्र आर्थिक अडचणी, शैक्षणिक साहित्याचा खर्च, परीक्षा शुल्क, प्रवास आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी लागणारा खर्च यांमुळे त्यांच्या स्वप्नांना मर्यादा येतात. अशा वेळी वेळेवर मिळालेली मदत विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देऊ शकते.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण पाटील यांनी ढेकूसिम परिसरातील ३५ विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे केला आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणात अडचणी आल्यास तसेच परीक्षा किंवा पोलीस भरतीसाठी जाताना आर्थिक मदतीची गरज भासल्यास ते स्वतः खर्च करण्यासाठी पुढाकार घेतात. या मदतीमागे केवळ आर्थिक सहकार्य नसून विद्यार्थ्यांनी शिकावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि कुटुंबाची तसेच गावाची प्रगती करावी, ही भावना असल्याचे त्यांच्या कार्यातून दिसून येते. आजच्या काळात स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या ग्रामीण तरुणांना मार्गदर्शनासोबतच आर्थिक आधाराचीही गरज असते. भरती प्रक्रियेसाठी प्रवास, कागदपत्रे, तयारी आणि इतर आवश्यक बाबींवर खर्च होतो. अशा वेळी एखाद्या तरुणाला मदत मिळणे म्हणजे त्याच्या प्रयत्नांना बळ मिळणे होय. प्रवीण पाटील यांचा हा पुढाकार ग्रामीण भागातील इतर सक्षम व्यक्तींनाही सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून देणारा आहे. त्यांच्या मदतीचा लाभ घेतलेल्या तरुणांपैकी आतापर्यंत सहा जणांना शासनाच्या विविध पदांवर नोकरी मिळाल्याचे सांगितले जाते. या यशामध्ये प्रवीण पाटील यांचा खारीचा वाटा असल्याचे नमूद केले जाते. विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची मेहनत, कुटुंबाचा त्याग आणि मार्गदर्शकांचे योगदान असते; अशा प्रवासात आर्थिक मदत करणारा हातही तितकाच मोलाचा ठरतो. एका विद्यार्थ्याला योग्य वेळी दिलेले प्रोत्साहन पुढे संपूर्ण कुटुंबाच्या प्रगतीचे कारण बनू शकते.

पत्नी सुरेखा पाटील यांच्या ग्रामविकासाला खंबीर साथ



प्रवीण पाटील यांच्या सामाजिक वाटचालीचा उल्लेख करताना त्यांच्या पत्नी सुरेखा प्रवीण पाटील यांच्या कार्याची दखल घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सुरेखा पाटील या ढेकूसिम-अंबासन-चारम परिसरातील ग्रामपंचायतीच्या विद्यमान लोकनियुक्त सरपंच असून शिवसेनेच्या अमळनेर महिला तालुका प्रमुख म्हणूनही कार्यरत आहेत. गावाच्या विकासासाठी नेतृत्व करताना त्यांना स्थानिक प्रश्नांची जाण, लोकांशी संवाद आणि विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याची आवश्यकता असते. "प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका महिलेचा हात असतो," असे नेहमी म्हटले जाते. मात्र प्रवीण आणि सुरेखा पाटील यांच्या सहजीवनाकडे पाहताना या म्हणीची दुसरी बाजूही समोर येते. गावाच्या विकासासाठी सार्वजनिक जीवनात सक्रिय असलेल्या सुरेखा पाटील यांना प्रवीण पाटील यांची मिळणारी साथ महत्त्वाची आहे. पत्नीच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला प्रोत्साहन देणे, त्यांच्या जबाबदाऱ्यांना समजून घेणे आणि ग्रामविकासाच्या ध्येयात सहभागी होणे, हे त्यांच्या सहकार्याचे वैशिष्ट्य आहे. कुटुंबातील परस्पर विश्वास आणि एकमेकांच्या कार्याविषयीचा आदर यांमुळे सामाजिक उपक्रमांना बळ मिळते.

सुरेखा पाटील यांचे सरपंच म्हणून काम आणि प्रवीण पाटील यांची सामाजिक मदतीची भूमिका या दोन्हींचा केंद्रबिंदू गावाची प्रगती आणि नागरिकांचे जीवनमान उंचावणे हाच आहे.

ग्रामविकासाच्या कामांतून गावाला नवी दिशा

सरपंच म्हणून सुरेखा पाटील यांनी गावात विविध सार्वजनिक सुविधांच्या विकासासाठी पुढाकार घेतल्याची माहिती आहे. त्यामध्ये शाळकरी मुली आणि महिलांसाठी बैठक व्यवस्था उपलब्ध करणे, जनसुविधा योजनेअंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, आर्च सिमेंट बंधारा, व्यायामशाळेसाठी अत्याधुनिक साहित्य, अभ्यासिकेचे बांधकाम, सोलर हायमास्ट दिवे आणि सांत्वन शेड यांसारख्या कामांचा समावेश आहे.

या सुविधांचे महत्त्व केवळ बांधकामापुरते मर्यादित नाही. महिलांसाठी आणि मुलींसाठी बैठक व्यवस्था असणे म्हणजे सार्वजनिक ठिकाणी आवश्यक सुविधा निर्माण करणे. रस्त्यांचे काँक्रिटीकरण झाल्यास दळणवळण सुलभ होण्यास मदत होते. सोलर हायमास्ट दिव्यांमुळे सार्वजनिक परिसरात प्रकाशव्यवस्था उपलब्ध होते. व्यायामशाळेतील आधुनिक साहित्य तरुणांना व्यायाम आणि आरोग्याकडे वळण्यासाठी प्रोत्साहन देऊ शकते. अभ्यासिकेमुळे विद्यार्थ्यांना शांत वातावरणात अभ्यास करण्याची संधी मिळू शकते. गावातील शैक्षणिक सुविधांच्या बळकटीकरणासाठी डिजिटल अंगणवाडी आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विकासाचाही समावेश करण्यात आला आहे. बालवयापासून शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, मुलांना आधुनिक शिक्षणाशी जोडणे आणि शाळेचे वातावरण अधिक उपयुक्त बनविणे, या दृष्टीने अशा उपक्रमांना महत्त्व आहे.

याशिवाय विविध सण-उत्सव साजरे करून सामाजिक एकोपा टिकविण्याच्या उपक्रमांतही सुरेखा पाटील अग्रेसर असल्याचे सांगितले जाते. गावाच्या विकासात भौतिक सुविधांइतकेच सामाजिक सलोखा, सहभाग आणि परस्पर सहकार्यही आवश्यक असते. विकासकामे आणि सामाजिक उपक्रम यांची सांगड घातल्यास गावाच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळू शकते.

वाढदिवसानिमित्त सेवाभावी कार्याला सलाम

प्रवीण संभाजी पाटील उर्फ पप्पूदादा यांचा प्रवास हा पोलीस सेवेतील जबाबदारी आणि गावाशी असलेल्या नात्याची सांगड घालणारा आहे. २२ वर्षांची पोलीस सेवा, पालकमंत्र्यांचे १५ वर्षे अंगरक्षक म्हणून काम, ३५ विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदतीचा पुढाकार आणि पत्नीच्या ग्रामविकासाच्या कार्याला दिलेली साथ या त्यांच्या वाटचालीतील महत्त्वाच्या बाबी आहेत. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देताना त्यांच्या पुढील आयुष्यात उत्तम आरोग्य, आनंद आणि यश लाभो, अशी सदिच्छा व्यक्त करणे औचित्यपूर्ण ठरेल. त्यांच्या सामाजिक कार्याला अधिक व्यापक स्वरूप मिळो, गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात मिळत राहो आणि ढेकूसिमसह परिसराच्या विकासासाठी त्यांचे योगदान वाढत राहो, हीच अपेक्षा. कर्तव्य वर्दीतील असो किंवा समाजाप्रतीचे, त्यामागे माणुसकीची भावना असेल तर त्या कार्याला खरा अर्थ प्राप्त होतो. प्रवीण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सेवाभावी वृत्तीला आणि सुरेखा पाटील यांच्या ग्रामविकासाच्या प्रयत्नांना मनःपूर्वक शुभेच्छा!

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा — प्रवीण संभाजी पाटील उर्फ पप्पूदादा!

-वाल्मिक पाटील सर
धरणगांव तालुका ग्रामिण प्रतिनिधी
संपर्कसूत्र - 7620674612

धुळीचे साम्राज्य, तरीही हवेची गुणवत्ता 'उत्तम' कशी?

बांधकामांवरील प्रदूषण मोजणाऱ्या यंत्रांच्या विश्वासार्हतेवरच बोट

जन सम्राट टाईम्स



मुंबई : मुंबई शहरात सुरू असलेल्या शेकडो बांधकामांच्या ठिकाणी धूळ आणि प्रदूषणाचे लोट हवेत पसरत असताना प्रत्यक्षात मात्र तेथील हवा गुणवत्ता दर्शक यंत्रांवर प्रदूषणाची पातळी 'शून्य' किंवा अवधी 'एक अंकी' नोंदवली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बांद्रा आणि खार परिसरातील बांधकामांच्या ठिकाणी बसविण्यात आलेल्या या यंत्रांच्या अचूकतेवर 'आवाज फाउंडेशन'ने थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अशा संशयास्पद यंत्रांची कसून तांत्रिक तपासणी आणि प्रमाणीकरण केल्याशिवाय त्यांची आकडेवारी महापालिकेच्या अधिकृत नोंदींमध्ये समाविष्ट करू नये, अशी जोरदार मागणी फाउंडेशनच्या प्रमुख सुमायरा अब्दुलअली यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. आवाज फाउंडेशनने मार्च ते मे आणि सप्टेंबर ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत बांद्रा व खार परिसरातील बांधकामस्थळांवरील यंत्रांची ३८ दिवसांत २३० वेळा छायाचित्रे घेऊन पाहणी केली.२३ मार्च ते ५ मे या कालावधीत २६ दिवस या यंत्रांवरील नोंदींची तुलना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या 'समीर' ॲपवरील खेरवाडी व बीकेसी येथील अधिकृत हवा गुणवत्ता केंद्रांच्या आकडेवारीशी केली. या तौलनिक अभ्यासात अधिकृत केंद्रांच्या आणि बांधकामस्थळांवरील यंत्रांच्या नोंदींमध्ये प्रचंड मोठी तफावत उघडकीस आली. या काळात सलग आठ दिवस खेरवाडी किंवा बीकेसी येथील केंद्रांवर 'पीएम १०' प्रदूषकाची नोंद प्रति घनमीटर १०० मायक्रोग्रॅमपेक्षा अधिक असताना, जवळच सुरू असलेल्या प्रत्यक्ष बांधकामस्थळांवर मात्र प्रदूषण नसल्यासारखी नोंद दाखवली जात होती.पाली हिलमधील नरगिस दत्त रस्त्यावरील एका सक्रिय बांधकामस्थळावर १३ आणि २४ एप्रिल रोजी 'पीएम २.५' या घातक सूक्ष्म कणांची नोंद चक्क 'शून्य' दाखवण्यात आली होती; तर २४ एप्रिल रोजी 'पीएम १०'ची नोंदही शून्य होती.विशेष म्हणजे, १३ एप्रिलला याच यंत्रावर 'पीएम १०'ची पातळी ३४ असताना 'पीएम २.५' मात्र शून्य नोंदवले गेले. सक्रिय बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी अशी शून्य नोंद येणे केवळ अशक्य असल्याने ही यंत्रे सदोष, छेडछाड केलेली किंवा दिशाभूल करणारी असल्याचा संशय बळावला आहे.पाहणी केलेल्या २६ दिवसांपैकी तब्बल १६ दिवस किमान एका यंत्रावर 'पीएम २.५'ची नोंद प्रति घनमीटर १० मायक्रोग्रॅमपेक्षा कमी दाखवली गेली. २९ आणि ३१ मार्च रोजी तर सहापैकी पाच यंत्रांवर' पीएम २.५' शून्य ते नऊ दरम्यान होते, तर ३ एप्रिलला खेरवाडीत 'पीएम १०' ९१ आणि बीकेसीत १३३ असताना बांधकामांवरील यंत्रे मात्र हवेची स्थिती उत्तम असल्याचा आभास निर्माण करत होती. मुंबई शहरात सुरू असलेल्या शेकडो बांधकामांच्या ठिकाणी धूळ आणि प्रदूषणाचे लोट हवेत पसरत असताना प्रत्यक्षात मात्र तेथील हवा गुणवत्ता दर्शक यंत्रांवर प्रदूषणाची पातळी 'शून्य' किंवा अवधी 'एक अंकी' नोंदवली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

पदवीधर नसलेल्यांचेही मतदान? काँग्रेसचा आरोप!

18 ते 20 वयोगटातील नावे आढळल्याचा दावा

जन सम्राट टाईम्स



नागपूर : पदवीधर निवडणुकीसाठी नोंदणी करूनही मतदारयादीत नाव नसल्याने अनेकांना मतदान करता आले नाही, अशा तक्रारी पुढे येत असतानाच काँग्रेसने गंभीर आरोप केला आहे. पदवीधर नसलेल्या व्यक्तींनीही या निवडणुकीत मतदान केल्याचा दावा काँग्रेसने केला असून, मतदारयादीत १८ ते २० वर्षे वयोगटातील मतदारांची नावे आढळल्याचेही पक्षाचे म्हणणे आहे. त्यामुळे निकालापूर्वीच मतदानाच्या वैधतेवरून राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

पदवीधर मतदारसंघासाठी शुक्रवारी मतदान झाले असून मंगळवारी मतमोजणी होणार आहे. त्यापूर्वीच रविवारी महाल येथील देवडिया काँग्रेस भवनात आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी पदवीधर नसलेल्या व्यक्तींनी मतदान केल्याचा आरोप केला. ' बोगस पदवीधरांचे मतदान हा लोकशाहीवरील हल्ला आहे,' असे ते म्हणाले. यापूर्वी शनिवारी युवक काँग्रेसने मतदारयादीतील १८ ते २० वर्षे वयोगटातील नोंदींवर आक्षेप घेत चौकशीची मागणी केली होती. विशेषतः २०२६ मध्ये सुमारे २० वर्षे वय असलेल्या व्यक्तींची पदवीधर मतदारसंघाच्या यादीत नोंदणी कोणत्या आधारावर झाली, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अभियांत्रिकी पदविका प्राप्त व्यक्तींच्या समावेशावरही युवक काँग्रेसने आक्षेप नोंदविला आहे. पदवीधर मतदारसंघासाठी निर्धारित शैक्षणिक पात्रतेचे निकष संबंधित मतदारांच्या बाबतीत पाळले गेले का, याची तपासणी करण्याची मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. दरम्यान, मतदारयादीतील नोंदी किंवा मतदानाबाबत करण्यात आलेल्या आरोपांची अधिकृत पडताळणी झालेली नाही. त्यामुळे संबंधित मतदारांची शैक्षणिक पात्रता, नोंदणीचे निकष आणि मतदान प्रक्रियेची तपासणी झाल्यानंतरच या आरोपांमागील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. पात्रतेच्या पडताळणीवर प्रश्न पदवीधर मतदारसंघासाठी स्वतंत्र मतदार नोंदणी प्रक्रिया असते. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, रहिवासी तपशील आणि आवश्यक पुरावे सादर करावे लागतात. त्यानंतर प्रशासनाकडून यादी तयार केली जाते. मात्र, नोंदणी प्रक्रियेत कागदपत्रांची प्रत्यक्ष पडताळणी कितपत झाली, अपात्र नावे कशी आली आणि पात्र असूनही काहींची नावे का राहिली, या प्रश्नांवर आता चर्चा सुरू झाली आहे. निवडणूक प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी विरोधकांकडून होण्याची शक्यता आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

स्व. अजितदादा सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणारे दिलदार नेतृत्व!

पाडळसे धरणाला अजितदादांचे नाव देण्यासाठी प्रयत्न करणार; पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: अजितदादा पवार हे स्पष्टवक्ते, निर्णयक्षम आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. स्वभावाने कणखर असले तरी सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत त्यांचे मन नेहमीच हळवे होते. पक्ष कोणताही असो, सामान्य माणसाचा प्रश्न समोर आला की मदतीचा हात पुढे करण्यात त्यांनी कधीही भेदभाव केला नाही. अशा दिलदार आणि लोकाभिमुख नेतृत्वाचे जाणे ही महाराष्ट्राची मोठी हानी आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी पाडळसे धरणाला त्यांचे नाव देण्यासाठी प्रयत्नशील राहू," अशी भावना राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केली. जळगाव शहरातील रिंग रोडवरील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य शाखेत दिवंगत अजितदादा पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते आणि सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. त्यानंतर छत्रपती संभाजीराजे नाट्यगृहात आयोजित मुख्य समारंभात पालकमंत्री बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अजितदादांच्या कार्यकर्तृत्वाच्या आठवणींना उजाळा दिला. अजितदादांच्या आठवणी सांगताना पालकमंत्री भावुक अजितदादा पवार यांच्यासोबतच्या आठवणी सांगताना गुलाबराव पाटील भावुक झाले. ते म्हणाले की, अजितदादा अर्थमंत्री असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी ४७ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली. सर्वसामान्यांच्या कामांना न्याय देण्याची त्यांची कार्यपद्धती होती. काम करताना शिस्त, निर्णय घेताना ठामपणा आणि माणसांशी वागताना



आपुलकी, ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये होती. आज ते आपल्यात नसले तरी त्यांनी केलेली कामे आणि त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहतील, असेही पालकमंत्र्यांनी नमूद केले. जिल्हा बँकेच्या आवारात अजितदादांचा पूर्णाकृती पुतळा उभारून त्यांच्या कार्याचा सन्मान केल्याबद्दल त्यांनी बँकेच्या संचालक मंडळाचे अभिनंदन केले.सहकार क्षेत्रासाठी अजितदादांचे योगदान प्रेरणादायी – बाबासाहेब पाटील सहकारमंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, अजितदादा पवार यांना सहकार, शेती, दुग्धव्यवसाय आणि उद्योग क्षेत्राची सखोल जाण होती. अडचणीत असलेल्या सहकारी संस्थांना मदत करून त्यांनी सहकार चळवळीला बळ दिले. सहकार क्षेत्रातील त्यांचे योगदान प्रेरणादायी आहे. जळगाव जिल्हा बँकेच्या सुमारे ४,५०० कोटी रुपयांच्या ठेवी आणि २३२ शाखांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामकाजाचे त्यांनी कौतुक केले.

अजितदादांचा पुतळा बँकेचे संचालक, कर्मचारी आणि भावी पिढीला सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करण्याची प्रेरणा देत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. कठोर निर्णय, पण कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे नेतृत्व वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांनी अजितदादांच्या शिस्तप्रिय आणि निर्णयक्षम नेतृत्वाचा उल्लेख केला. वित्त व नियोजन विभागाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी आर्थिक शिस्तीला महत्त्व दिले.

राजकीय मतभेद बाजूला ठेवून महाराष्ट्राच्या विकासासाठी निर्णय घेण्याची त्यांची भूमिका होती.कार्यकर्त्यांना शिस्त लावत असतानाच त्यांच्या योग्य कामांसाठी ते मदतीला उभे राहत असत. जिल्ह्यातील अनेक विकासकामांना त्यांच्या कार्यकाळात मंजुरी मिळाली. त्यांच्या कार्याची आठवण हा पुतळा कायम करून देत राहील, असे संजय सावकारे यांनी सांगितले. मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना यावेळी खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार अनिल पाटील, जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष अशोक जैन आणि माजी खासदार ईश्वरबाबूजी जैन यांनी अजितदादांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा देत आपल्या भावना व्यक्त केल्या. जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांनी बँकेच्या कामकाजाचा आढावा घेत अजितदादांच्या सहकार क्षेत्रातील योगदानाविषयीचे अनुभव सांगितले. बँकेचे उपाध्यक्ष तथा आमदार अमोल पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या तैलचित्राचेही अनावरण कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा बँकेच्या मुख्य इमारतीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या तैलचित्राचे अनावरण सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित माहितीपट दाखविण्यात आला. या सोहळ्यास सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ, आमदार अनिल पाटील, प्रा. चंद्रकांत सोनवणे, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण, महापौर दीपमाला काळे, माजी मंत्री गुलाबराव देवकर, सतीश पाटील, माजी खासदार ईश्वरबाबूजी जैन, जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष अशोक जैन, धुळ्याचे माजी आमदार शरद पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार, उपाध्यक्ष आमदार अमोल पाटील, कार्यकारी संचालक जितेंद्र देशमुख, माजी महापौर विष्णू भंगाळे, जयश्री महाजन, रवींद्र भैय्या पाटील, रोहित निकम, प्रतिभा शिंदे यांच्यासह बँकेचे संचालक, आजी-माजी लोकप्रतिनिधी, विविध पक्षांचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदक हर्षल पाटील यांनी केले. प्रास्ताविकात संजय पवार यांनी पुतळा अनावरणाविषयी माहिती दिली, तर माजी मंत्री गुलाबराव देवकर यांनी आभार मानले. जिल्हा बँकेचे सभासद, सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने या सोहळ्याला उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

साक्री पोलिसांचा अवैध डिझेल विक्रीच्या संशयित धंद्यावर छापा



जन सम्राट टाईम्स

साक्री । प्रतिनिधी : सुरत-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील काकाचा ढाबा परिसरात टँकरमधून बेकायदेशीररीत्या डिझेल काढले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर साक्री पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. बोडकीखडी परिसरातील पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या या प्रकारात पोलिसांनी डिझेल टँकरसह एकूण ४८ लाख ५ हजार ४८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी टँकरचालकाला ताब्यात घेण्यात आले असून, पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांची कारवाई परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक ओमकार गवळी यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे साक्री पोलिसांच्या पथकाने बोडकीखडी परिसरात छापा टाकला. यावेळी एका पत्र्याच्या शेडमध्ये टँकरमधून डिझेल काढले जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत टँकरचालक चंद्रप्रकाश वीरेंद्रकुमार मिश्रा (रा. प्रयागराज, उत्तर प्रदेश) याला ताब्यात घेतले. चौकशीत इतरांची नावे समोर टँकरचालकाकडे अधिक चौकशी केली असता सचिन जीवनराम मुरतडकर (वय २९, रा. मिरच्या मारुती चौक, धुळे) आणि सलीम इसुफ खान (रा. राजस्थान) यांच्यासह अन्य व्यक्तींचा या प्रकारात सहभाग असल्याची माहिती मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ४८ लाख ५ हजार ४८ रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास साक्री पोलीस करत आहेत. डिझेल काढण्यामागील नेमका उद्देश, या व्यवहारामागील इतर व्यक्ती आणि संपूर्ण प्रकाराचे स्वरूप तपासातून स्पष्ट होणार आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक ओमकार गवळी यांच्या नेतृत्वात साक्री पोलिसांनी ही कारवाई केली.

लुंबिनी बुद्ध विहारात वर्षावास समापन सोहळा उत्साहात

अश्विन पौर्णिमेनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी : धुळे येथील लुंबिनी बुद्ध विहारात अश्विन पौर्णिमेचे औचित्य साधून वर्षावास समापन सोहळा, धम्म प्रवचन आणि खीरदान कार्यक्रम उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. लुंबिनी बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्ट आणि लुंबिनी बुद्ध विहार महिला संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २५ ऑक्टोबर) सायंकाळी ६ वाजता या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला धुळे शहरातील बौद्ध उपासक-उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. त्रिशरण पंचशील ग्रहण; भंते धम्मज्योती यांचे धम्म प्रवचन कार्यक्रमाची सुरुवात भंतेजींची याचना करून करण्यात आली. त्यानंतर भंतेजींच्या उपस्थितीत उपस्थितांनी त्रिशरण पंचशील ग्रहण केले. यावेळी भंते धम्मज्योती यांनी उपस्थितांना धम्मविषयक मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रवचनातून उपस्थितांना भगवान गौतम बुद्धांच्या



विचारांचा आणि धम्ममार्गाचा परिचय करून घेण्याची संधी मिळाली. कार्यक्रमादरम्यान भंतेजींना चिवरदान व धम्मदान अर्पण करण्यात आले. नवगिरे परिवारातर्फे खीरदान; बोराळकर परिवाराचे अल्पोपहाराचे योगदान या सोहळ्यात खीरदानाचे आयोजन नवगिरे परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. तसेच उपस्थित उपासक-उपासिकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था बोराळकर परिवाराने केली होती. या योगदानामुळे कार्यक्रमाला सेवाभावाची जोड मिळाली. मान्यवरांसह महिला उपासिकांची लक्षणीय उपस्थिती या कार्यक्रमाला नगरसेविका आयुष्यमानिनी पूनम ताई शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्राचार्य राजेंद्र बोराळकर, इंजिनियर धर्मेंद्र झालटे, साहेबराव लोंढे, अनिल मोहिते, गौतम भामरे, किशन शिरसाट, पगारे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व बौद्ध समाजबांधव उपस्थित होते. लुंबिनी बुद्ध विहार महिला संघाच्या वतीने कल्पना ताई बोराळकर, सुमन ताई लोंढे, लता ताई मैराळ, अरुणा मोरे, नूतन गांगुर्डे, सुरेखा जाधव, रेखा सूर्यवंशी आणि सोनाली नवगिरे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपासिकांनी सहभाग नोंदविला. संपूर्ण सोहळा शिस्तबद्ध आणि धम्ममय वातावरणात पार पडला. वर्षावास समापनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून धम्मविचार, दानपारमिता आणि सामाजिक एकोपा यांचा संदेश देण्यात आला.

वाढदिवसाचे औचित्य साधत माजी विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम!

जन सम्राट टाईम्स

धुळे । (प्रतिनिधी): माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेप्रती असलेली कृतज्ञता केवळ शब्दांत नव्हे, तर सामाजिक उपक्रमांतून व्यक्त करावी, याचा आदर्श शासकीय विद्यानिकेतन, धुळे येथील माजी विद्यार्थी राजेंद्र पाटील यांनी घालून दिला आहे. आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांनी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले. आरोग्य तपासणीसोबतच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव निर्माण करणाऱ्या उपक्रमालाही यावेळी प्रोत्साहन देण्यात आले. महाराष्ट्रातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये गणल्या जाणाऱ्या शासकीय विद्यानिकेतनमध्ये आयोजित या शिबिरासाठी धुळे जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे हे तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. विशेष



